आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे चे आदर्श वाणिज्य आणि कला महाविद्यालय, बदलापूर येथे आज दिनांक 13 जुलै 2022 रोजी मराठी वांग्मय मंडळ, WDC , IQAC आणि अखिल विश्व गायत्री परिवार, बदलापूर यांच्या संयुक्त संयोजनाने "गुरूपौर्णिमा" कार्यक्रम आयोजित केला गेला. कार्यक्रमामध्ये डॉ. वरूण माणिक (एम.डी.) यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.
या कार्यक्रमास आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष माननिय श्री जनार्दन घोरपडे , उपाध्यक्ष श्री रघुनाथ पाटील आणि सह सचिव श्री पंढरीनाथ बाविसकर यांनी उपस्थिती लावली होती.
या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातीलच काही मुलांनी म्हटलेल्या स्वागतगीताने झाली. गुरूपौर्णिमेच्या कार्यक्रमाची प्रस्तावना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यानी दिली. आपल्या भाषणामध्ये बोलताना त्यांनी योग्य गूरूचे मार्गदर्शक लाभले तर आपण आयुष्यामध्ये कोणतेही ध्येय सहज पणे गाठू शकतो याबद्दल उदाहरणे दिली.
श्री रघुनाथ पाटील यांनी आपल्या भाषणात आई-वडील हे आपले पहिले गूरू असतात व त्यांची आपण आयुष्यभर सेवा केली पाहिजे अश्या प्रकारचा मोलाचा सल्ला आपल्या मुलांना दिला.
त्यानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने अभंग म्हणून कार्यक्रमाची रंगत अजूनच वाढवली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अखिल विश्व गायत्री परिवार, बदलापूर यांच्या

जयश्री शिंपी मॅडम यांनी दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शक भाषण सुरू झाले.
व्यवसायाने डॉक्टर असलेल्या वरूण माणिक सरांनी मुलांना अभ्यास करण्यासाठी गरजेच्या गोष्टींचे मार्गदर्शन केले. अभ्यास करत असताना सातत्य , नियमितता आणि अभ्यासाचा आनंद घेणे या गोष्टींचे महत्व पटवून दिले. त्यानंतर त्यांनी 50-10 मिनिटांचे शास्त्र समजावून सांगितले. सकाळी उठल्यावर व रात्री झोपताना नियमितपणे करायची दिनचर्या व त्यासाठी लागणारे सातत्य याबद्दल माहिती दिली. मुलांकडून काही बौध्दिक व्यायाम करून घेतले. अभ्यास करताना काय करावे व काय करू नये याबद्दल देखिल मार्गदर्शन केले.
यानंतर, सुमीत गौरे सरांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.